सकाळ

# 'केबीपी मॅनेजमेंट'मध्ये सायबर सुरक्षा जागृकता

**सातारा, ता. १४ :** वर्ये (ता. सातारा) येथील कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज ॲण्ड रिसर्च येथील बीसीए विभागाच्या विद्यार्थ्यांनी क्विक हिल फाउंडेशन व महाराष्ट्र पोलिस सायबर सेल यांच्यातर्फे सुरू केलेले सायबर गुन्हे रोखण्यासाठी सायबर सुरक्षेचे सामाजिक कार्य सुरू केले आहे.

या सायबर जागरूकता कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेची माहिती दिली. पथनाट्यातून ही माहिती युवकांपर्यंत पोचविली. प्रभात फेरीमध्ये सायबर सिक्युरिटी संबंधित घोषणा देण्यात आल्या. रॅली व पथनाट्यातून लोकांना इंटरनेट हॅकर्सचे शिकार होण्यापासून वाचवूया, आपल्याला आलेला ओटीपी सुरक्षेच्या प्रतिज्ञे केली.

यात सर्वांनी इंटरनेट वापरताना नियमांचे पालन करूया, कोणत्याही आमिषाला बळी पडणार नाही, अशी अशी प्रतिज्ञा केली. ॲड. अदिती कासार, संचालक डॉ. बी. एस. सावंत, डॉ. आर. डी. कुंभार, समन्वयक विकास चव्हाण उपस्थित होते.